सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात (दि.०४ मार्च ते ११ मार्च, २०२५ हा औद्योगिक सुरक्षा सप्ताह धरुन) कारखान्यात काम करीत असलेल्या कामगारांच्या सुरक्षा, आरोग्य व कल्याण इ. बाबतची जाहिरातीच्या माध्यमातून जनजागृती करण्यासाठी जाहिरात माध्यम आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,
शासन निर्णय क्र. औसुवआ-०७२४/प्र.क्र.१०६/कामगार-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ६ ऑगस्ट, २०२४.

पहा :- १) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांचे क्र. औसुवआ/आस्थापना/जाहिरात-२०२४-२५/७५९९/१, दि. १६.०७.२०२४ रोजीचे पत्र
२) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांचे इतिवृत्त क्र. वृत्तचित्र २०२४/मा.आ. उपस्थिती/ कार्या-७, दिनांक २९.०७.२०२४.

प्रस्तावना :-

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय (पूर्वीचे कारखाने निरिक्षक) ही महाराष्ट्र शासनाची प्रशासकीय यंत्रणा असून तिचा उद्देश कारखाने अधिनियम, १९४८, महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ व त्याअंतर्गत तयार केलेले नियम यांची अंमलबजावणी करणे व कारखान्यात काम करीत असलेल्या कामगारांच्या सुरक्षा, आरोग्य व कल्याणाची खात्री करणे हा आहे. तसेच संचालनालयास धोकादायक रसायनांचे उत्पादन साठवण व आयात नियम, १९८९, रासायनिक अपघात (आपत्कालीन नियोजन, सुसज्जता व प्रतिसाद) नियम, १९९६ व महाराष्ट्र कारखाने (अतिधोकादायक कारखान्यांचे नियंत्रण) नियम, २००३ च्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याची जबाबदारीसुध्दा देण्यात आलेली आहे. सबब, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात (दि.०४ मार्च ते ११ मार्च, २०२५ हा औद्योगिक सुरक्षा सप्ताह धरुन) **राज्यातील** कारखान्यात काम करीत असलेल्या कामगारांच्या सुरक्षा, आरोग्य व कल्याण इ. बाबतची जाहिरातीच्या माध्यमातून जनजागृती करण्यासाठी माहिती व जनसंपर्क संचालनालयाने रु.१,२३,८९,१००/- (अक्षरी रु. एक कोटी तेवीस लाख एकोणनव्वद हजार शंभर फक्त) इतक्या रकमेच्या जाहिरात माध्यम आराखड्यास मान्यता दिलेली आहे. सदर रु. १,२३,८९,१००/- (अक्षरी रु. एक कोटी तेवीस लाख एकोणनव्वद हजार शंभर फक्त) इतक्या रकमेच्या जाहिरात माध्यम आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : -

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात (दि.०४ मार्च ते ११ मार्च, २०२५ हा औद्योगिक सुरक्षा सप्ताह धरुन) **राज्यातील** कारखान्यात काम करीत असलेल्या कामगारांच्या सुरक्षा, आरोग्य व कल्याण इ. बाबतची जाहिरातीच्या माध्यमातून जनजागृती करण्यासाठी **रु.१,२३,८९,१००/- (अक्षरी रु. एक कोटी तेवीस लाख एकोणनव्वद हजार शंभर फक्त)** इतक्या रकमेच्या जाहिरात माध्यम आराखड्यास या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरहू माध्यम आराखड्याचा तपशील खालील प्रमाणे:-

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय								
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय प्रस्तावित माध्यम आराखडा								
जाहिरात निर्मिती साहित्य तपशील (Production of Creative)								
क्र.	माध्यम	स्वरूप	तपशील	रक्कम (प्रती नग)	संख्या	रक्कम	जीएसटी	एकूण अंदाजित रक्कम (सर्व करांसहित)
१	प्रिंट	--	प्रिंट आणि इतर बाह्य माध्यमांकरीता जाहीरातीचा मजकूर (Adaption, Translation, Formating from One Media to other Media)	१०,०००	१	१०,०००	१,८००	११,८००
	टिव्हीसी	--	TVC-60 Sec.-As per DAVP rate	७,००,०००	१	७,००,०००	१,२६,०००	८,२६,०००
	जिंगल्स / स्पॉट	--	Audio Jingle (60 Sec.)	४५,०००	१	४५,०००	८,१००	५३,१००
Total-A						७,५५,०००	१,३५,९००	८,९०,९००

जाहीरात प्रसिध्दी तपशील (Details of Advertisement)								
क्र	Media	मुळ दर, प्रक्रिया	Details	वारंवारता	संख्या/ दिवस	एकूण अंदाजित रक्कम (सर्व करासहित)	जीएसटी	एकूण अंदाजित रक्कम (सर्व करांसहित)
इलेक्ट्रॉनिक माध्यमे (वृत्तचित्र शाखा)								
१	मराठी वृत्त वाहीन्या	CBC (DAVP) यादीवरील व दर	४५ ते ६० सेकंद जाहीरातीचे प्रसारण प्रत्येक बँडमध्ये नमूद दराच्या मर्यादेत समसमान जाहीरात प्रसारण	नमूद अंदाज रक्कमेच्या मर्यादेत	७ दिवस	१०,००,०००	१,८०,०००	११,८०,०००
२	एफ एम वाहीन्या	CBC (DAVP) दर	राज्यातील एफ एम रेडीओ वाहीन्यावरून ऑडीओ जिंगलचे प्रसारण	नमूद अंदाज रक्कमेच्या मर्यादेत	७ दिवस	४,००,०००	७२,०००	४,७२,०००
३	आकाशवाणी	CBC (DAVP) दर	राज्यातील आकाशवाणी केंद्रावरून ऑडीओ जिंगलचे प्रसारण	नमूद अंदाज रक्कमेच्या मर्यादेत	७ दिवस	४,००,०००	७२,०००	४,७२,०००

समाज माध्यमे व डिजिटल माध्यमे (नव माध्यम शाखा)								
१	सोशल मिडीया	विहित ई-निविदा प्रक्रियेव्दारे	शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील संस्थांच्या सूचिमधील संस्थामार्फत विहित कार्यपध्दतीचे अवलंब करून प्रसिध्दी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिध्दी करण्याचे प्रस्तावित	नमूद अंदाजित रक्कमेच्या मर्यादेत	३० दिवस	३८,००,०००	६,८४,०००	४४,८४,०००
२	डिजिटल मिडीया	विहित ई-निविदा प्रक्रियेव्दारे	शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील संस्थांच्या सूचिमधील संस्थामार्फत विहित कार्यपध्दतीचे अवलंब करून प्रसिध्दी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिध्दी करण्याचे प्रस्तावित	नमूद अंदाजित रक्कमेच्या मर्यादेत	३० दिवस	३८,००,०००	६,८४,०००	४४,८४,०००
Total-B						९४,००,०००	१६,९२,०००	१,१०,९२,०००
TOTAL (A+B)						१,०१,५५,०००	१८,२७,९००	१,१९,८२,९००

१	शा.नि.दि. १३.८.२०२१ नुसार रू.५.०० कोटी इतक्या रकमेपर्यंतच्या प्रसिध्दी आराखड्या-साठी एकूण खर्चाच्या ४% (रू.२० लाख) आणि त्यापेक्षा प्रत्येक वाढीव रकमेसाठी २% (उर्वरित रकमेवर (रू.५ कोटी वजाजाता) प्रमाणे	शासन निर्णय तरतुदीनुसार	माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाला येणाऱ्या कार्यालयीन उपकरणावरील खर्च, सॉफ्टवेअर, तात्पुरता मनुष्यबळावरील खर्च, संशोधन खर्च, वाहतूक खर्च, इतर किरकोळ खर्च	४,०६,२००	--	४,०६,२००
			Total Expendature	१,०५,६१,२००		१,२३,८९,१००

२. सदर देयकांचा खर्च या विभागाच्या, "मागणी क्र. के-४, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे बळकटीकरण आणि सुरक्षाविषयक व आरोग्य विषयक बाबींची प्रभावी अंमलबजावणी (२२३० ५७९३) २६-जाहिरात व प्रसिध्दी" या लेखाशिर्षाखाली सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी उपलब्ध मंजुर अनुदानातून करण्यात करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र. विअप्र २०१३/प्र.क्र. ३०/ २०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग पहिला, उप विभाग दोन यामधील अ.क्र. ८, नियम क्र.१७ (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. त्याप्रमाणे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने संबंधित जाहिरात एजन्सी/आस्थापनांना कार्यादेश देण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करावी.

५. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांनी उपरोक्त नमूद देयकांबाबत कोणत्याही प्रकारचा विलंब न करता शासनास सादर करावीत.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्र. २०२४०८०६१६५७४०४७१० असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KARANSING PREMSING PATIL

Digitally signed by KARANSING PREMSING PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY LABOUR AND MINING DEPARTMENT, 2.5.4.20=6f2521c3a6d1f8429a3c2c9a42d575298ae82956908d63df441063695f377819, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C7FEED7178D6C14666A5DF36811F1763590E65B6F836A87E63789DC234173D66, cn=KARANSING PREMSING PATIL
Date: 2024.08.06 17:17:38 +05'30'

(क. प्रे. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, उप मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६) मा. प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) मा.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
८) उप सचिव (कामगार-१) उद्योग, ऊर्जा, खनिकर्म व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) अवर सचिव (प्रशासन-१), उद्योग, ऊर्जा, खनिकर्म व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) संचालक,औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,मुंबई
११) महालेखापाल -१/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२) अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४) निवडनस्ती (कामागार-१), उद्योग, ऊर्जा, खनिकर्म व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.